# MOUNT CARMEL INTERNATIONAL SCHOOL, AKOLA

**Cambridge International**

TERM END EXAM: II Subject: Marathi Date: 01.04.2024

Student's Name: ______________________________ Roll No. ______ Grade: 6

Marks: 35 Time Duration:60 minutes Invigilator's Sing.

**प्रश्न १. अ. खालील अपठित पद्य वाचून प्रश्नांची उत्तरे लिहा.** **(५)**

**The extract is given on a separate paper.**

१. कोण ते लिहा.

जगातले सारे ज्ञान देणारा ______________________________

२. एका वाक्यात उत्तर लिहा.

संगणक पटपट काय सोडवतो?

______________________________

______________________________

३. इंग्रजीत अर्थ लिहा.

संगणक ______________________

४. विरुद्धार्थी शब्द लिहा.

अज्ञान x ________________

५. वचन बदला.

गणिते ________________

**प्रश्न १ आ. खालील पठित उतारा वाचून प्रश्नांची उत्तरे लिहा.** **(५)**

**The extract is given on a separate paper.**

१. एका वाक्यात उत्तर लिहा.

मालती नशिबाला का दोष देत असे?

______________________________

______________________________

२. कोण ते लिहा.

अ. शंकराचे भव्य देऊळ असणारे नगर - ______________________________

आ. फुले विकण्यात दंग असणारी - ______________________________

३. विरुद्धार्थी शब्द लिहा.

अस्वस्थ x ________________

४. लिंग बदला.

शेजारीण ________________

**प्रश्न १. इ. खालील पठित उतारा वाचून प्रश्नांची उत्तरे लिहा.** **(५)**

**The extract is given on a separate paper.**

१. आकृती पूर्ण करा.

जंगलात वाट चुकलेले

२. कोण ते लिहा.

सुसाट पळत सुटणारे- ______________________

३. खालील प्रश्नाचे उत्तर लिहा.

डाकू कोणाच्या शोधात होते व का?

________________________________________________________________

________________________________________________________________

४. लिंग बदला.

माणसे _______________

५. समानार्थी शब्द लिहा.

रस्ता = _______________

**प्रश्न २. अ. रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.** **(२)**

१. राजा खूपच ______________ झाला.

२. ______________ खूप विचार करत होते.

**आ. कोण-कोणास म्हणाले ते लिहा.** **(१)**

"बागेतील थंड हवा आत घेऊन या."

_______________________________________________

**इ. शब्द शुद्ध करून लिहा.** **(१)**

दीवस ______________

**ई. वाक्यात उपयोग करा.** **(१)**

चक्कर येणे _______________________________________________

_______________________________________________

**उ. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा. (कोणतेही दोन)** **(२)**

१. राजाने काय खाल्ल्यामुळे तो सशक्त झाला?

_______________________________________________

_______________________________________________

२. बागेतील हवा कशी होती?

_______________________________________________

_______________________________________________

३. प्रधान हसत काय म्हणाला?

_______________________________________________

_______________________________________________

**प्रश्न ३. अ. योग्य विरामचिन्हे योजा व वाक्ये परत लिहा.** **(२)**

१. तिसरा ब्राह्मण म्हणाला अतिथी देवो भव:

_______________________________________________

२. राजाला मिळालेल्या चार शिकवण्यांपैकी कोणती शिकवण सर्वात उत्तम आहे

______________________________________________

______________________________________________

**आ. खालील वाक्यातील शब्दयोगी अव्यय ओळखून लिहा. (२)**

१. दुपारी मुले घराकडे गेले. ____________________

२. आमच्या घरासमोर एक फुलबाग आहे. ____________________

**इ. खालील वाक्यातील क्रियापद ओळखा व लिहा. (२)**

१. मुलगा खूप हुशार होता. ____________________

२. मी वर्गात गेलो. ____________________

**ई. खालील शब्दसमूहासाठी एक शब्द लिहा. (२)**

१. सर्व रोगांवर अचूक गुणकारी असे ____________________

२. गाण्यातील तान ____________________

**प्रश्न ४. पुढीलपैकी कोणत्याही एका विषयावर कृती करा. (५)**

**अ. खालील मुद्द्यांच्या आधारे कथालेखन करा. शीर्षक व तात्पर्य लिहिणे आवश्यक आहे.**

**मुद्दे:** एक शेतकरी_______वृद्ध होणे_______चारही मुलांना बोलावणे_______चार काठ्या_______प्रत्येकाने काठी तोडणे_______सहज तुटणे_______चार काठ्या एकत्र जोडायला सांगणे_______अशक्य शेतकऱ्यांचे सांगणे_______एकीने राहा.

**आ. तुमच्या शाळेत सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम पाहण्यासाठी पालकांना आवाहन करणारा सूचनाफलक तयार करा.**

**इ. निबंध लिहा :- "आई संपावर गेली तर"**

**************************

**Extract (Grade 6)**

**प्रश्न १. अ) अपठित पद्य**

संगणक आमुचा सखा नवा
प्रत्येकाला सतत हवा ||
अवघड गणिते हा सोडवी पटपट
अन् जगातले सारे ज्ञान, देतो आम्हा चटचट ||१||
की-बोर्डवर आम्ही टाईप करतो, माऊसवर क्लिक,
सखा संगणक म्हणे माझा, तुला हवे ते सारे शिक ||२||
देई आम्हा इंटरनेटवर, ज्ञान मनोरंजन भारी
देशविदेशी मित्र-मैत्रिणींची मैफिल जमवू न्यारी ||३||
संगणकाने दिले आम्हा, विश्वची आमुच्या हाती
साऱ्यांशी जोडू आम्ही, बंधूभावाची नाती ||४||

**प्रश्न १ आ) पठित उतारा**

चंद्रपूर नावाचे एक नगर होते. तिथे शंकराचे भव्य देऊळ होते. त्या नगरात दरवर्षी जत्रा भरत असे. बरेच जण मनोभावे शंकराची पूजाअर्चना करण्यासाठी देवळाच्या बाजूला बसणाऱ्या बायकांकडून फूल-हार घेत असे. त्या गावातच मधू आणि मालती नावाच्या दोन बायका राहत होत्या. मधूला मूलबाळ नव्हते. वर्षांनी तिला एक मुलगा झाला. पण तिच्या शेजारी असणाऱ्या मालतीला मात्र मूलबाळ झाले नाही. म्हणून ती नशिबाला सदैव दोष देत असे. दोघी एकमेकींच्या शेजारी बसून देवळात जाणाऱ्या लोकांना फुले विकत असे.

एक दिवस श्रावण सोमवार असल्यामुळे देवळात खूप गर्दी झाली. मधू फुले विकण्यात दंग होती. तिचे लहानगे बाळ तिच्या शेजारी झोपले होते. दुपारी गर्दी कमी झाल्यावर मधूचे लक्ष शेजारी झोपलेला बाळाकडे गेले पाहते तर काय? बाळ जागेवर नव्हते ती एकदम अस्वस्थ झाली. आपल्या बाळाला इकडे तिकडे शोधू लागली.

**प्रश्न १. इ) पठित उतारा**

एके दिवशी राजा आपल्या नवीन प्रधानाबरोबर शिकारीसाठी जंगलामध्ये गेला. तेथे त्याला एक सुंदर हरिण दिसले. राजाला त्या हरिणाची शिकार करण्याचा अनावर मोह झाला. तो आपल्या प्रधानाबरोबर त्या हरिणाचा पाठलाग करू लागला. हरीण सुसाट पळत सुटले. त्या हरिणाच्या मागोमाग राजा व प्रधान दाट जंगलात जाऊन पोचले. अखेरीस हरिण राजाला झुकांडी देऊन पार दिसेनासे झाले. पण राजा व प्रधान मात्र त्या दाट जंगलात वाट चुकले. त्या जंगलामध्ये काही डाकू राहत होते. ते डाकू आपल्या देवीला नरबळी वाहण्यासाठी माणसांच्या शोधातच होती. त्यावेळी वाट चुकलेले राजा आणि प्रधान त्या डाकूंच्या नजरेस पडले. त्या डाकूंनी लगेच राजा व प्रधानाला पकडले आणि बळी देण्यासाठी त्यांना देवळात घेऊन गेले. राजा आणि प्रधान दोघेही मोठ्या संकटात सापडले. डाकूंच्या तावडीतून आपला जीव वाचवण्यासाठी कोणताही मार्ग त्यांना दिसत नव्हता.

देवीला बळी वाहण्यासाठी सर्व अवयव असलेला माणूस पाहिजे. अशी डाकूंची श्रद्धा होती. म्हणून डाकूंच्या सरदाराने राजा आणि प्रधानाच्या सर्वांगाची बारकाईने पाहणी केली.

****************************